संदर्भः- जा.क्र.विद्या-९/ऑनलाईन परिक्षा/९५६/सन २०२०, दि. ०४/०५/२०२१

सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येत आहे की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील सत्र १,३,५,७ व ८ च्या अंतिम सत्र ऑनलाईन **लेखी** परीक्षेचा निकाल आज दि. ०५/०५/२०२१ रोजी विद्यापीठाने जाहिर केलेला असुन, महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर सर्व विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. विद्यार्थ्यांनी सदर निकालाचे अवलोकन करावे.

सदर ऑनलाईन परीक्षेमध्ये अनेक विद्यार्थ्यांना अडचणी आल्या होत्या. त्यामुळे जे विद्यार्थी सदर निकाला बाबत असमाधानी/ तक्रारी असतील त्यांची पुन्हा परिक्षा घेण्याबाबत वरील संदर्भीय पत्रान्वये महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांनी कळविले आहे. त्यानुसार सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या निकालाचे अवलोकन करावे व निकालाबाबत असमाधानी/तक्रारी असल्यास सोबत जोडलेल्या विहित नमुन्यामध्ये माहिती महाविद्यालयास दि. ०६/०५/२०२१ रोजी पर्यत मेलद्वारे (disp-btechfood@kkwagh.edu.in) सादर करावी.

ज्या विद्यार्थ्यांना कोविड - १९ अथवा इतर तांत्रिक कारणांमुळे विहित मुदतीत अर्ज सादर करणे शक्य होणार नाही अशा विद्यार्थ्यांनी आपल्या समुदपदेशकांसोबत विहित मुदतीतच संपर्क साधावा.

ज्या विद्यार्थ्यांनी पुन्हा होणाऱ्या लेखी परिक्षेसाठी यापुर्वी अर्ज सादर केलेले आहे अशा विद्यार्थ्यांचे अर्ज या सुचनेद्वारे रद्द करण्यात येत आहे. दि. ०५/०५/२०२१ ते दि. ०६/०५/२०२१ या कालावधी मध्ये अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांचीच नावे पुन्हा होणाऱ्या **लेखी** परिक्षेसाठी विचाराधीन असतील याची सर्व विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

(स्टॅम्प: के. के. वाघ अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय, नाशिक ४२२ ००३)

प्राचार्य
प्राचार्य,
के. के. वाघ अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय,
सरस्वतीनगर, पंचवटी, नाशिक-३.